


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २१३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.१६ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# पारनेर मध्ये वारकरी संप्रदायाला काळिमा !

## किर्तनकार 'महाराजा' चा अल्पवयीन मुलीवर अत्याचार

### पाच वर्षांपासून अत्याचार केल्याचा खळबळजनक प्रकार !



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१५, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेरमध्ये अध्यात्म आणि संस्काराचे धडे देणाऱ्या वारकरी संप्रदायाला काळिमा फासणारी एक अत्यंत संतापजनक घटना पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथे उघडकीस आली आहे. श्री दुर्गादिवी वारकरी शिक्षण संस्थेचा अध्यक्ष आणि कीर्तनकार यशवंत एकनाथ थोरात उर्फ अण्णासाहेब गुंजाळ (महाराज) याने एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर मागील पाच वर्षांपासून धाक दाखवून वारंवार अत्याचार केल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे.

पीडित मुलीला गरम लोखंडी पक्कडीने चटके देऊन अमानुष मारहाण केल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी इयत्ता आठवीत असल्यापासून हा प्रकार सुरू होता. आरोपी यशवंत थोरात हा पीडितेच्या शेजारीच राहत असल्याने दोन्ही कुटुंबांचे घरोब्याचे संबंध होते. पीडितेचा भाऊ आरोपीच्याच वारकरी शिक्षण संस्थेत सचिव म्हणून कार्यरत आहे. याचाच फायदा घेऊन आरोपीने २०२१ पासून पीडितेवर वाईट नजर ठेवली होती. मुलगी घरी एकटी असताना किंवा आरोपीच्या घरी कोणी नसताना त्याने वारंवार तिच्यावर बळजबरीने शरीरसंबंध प्रस्थापित केले.

पीडितेने विरोध करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने तिला जीवे मारण्याची धमकी दिली होती. मी दोन हाफ मर्डर केलेले आहेत, जर कोणाला काही सांगितले तर तुझ्या आई-वडिलांना आणि भावाला मारून टाकीन, अशी भीती तो घालत होता. कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी पीडितेने हा छळ मुकाट्याने सहन केला.

घटनेचा थरार १० मार्च २०२६ रोजी शिगेला पोहोचला. आरोपीने पीडितेला फोन करून त्याच्या घरी बोलावले. तिने येण्यास नकार दिला असता, त्याने कुटुंबाला संपवण्याची धमकी दिली. भीतीपोटी पीडिता त्याच्या घरी गेली असता, आरोपीने तिला कॉम्प्युटर रूममध्ये नेऊन बांबूने व चापटीने बेदम मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता, नराधम आरोपीने स्वयंपाकाची लोखंडी पक्कड गॅसवर गरम करून पीडितेला चटके दिले. या अमानुष कृत्यानंतरही त्याने तिच्यावर बळजबरीने अत्याचार केले. मारहाण आणि चटक्यांमुळे पीडितेला चालणेही कठीण झाले होते. १४ मार्च रोजी तिचा भाऊ घरी आला असता, तिला गंभीर अवस्थेत पाहून त्याने विश्वासात घेतले. मावस भावांच्या उपस्थितीत पीडितेने आपल्यावर झालेला पाच वर्षांचा अन्याय कथन केला. त्यानंतर पीडितेच्या भावाने पारनेर पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली.

पारनेर पोलिसांनी याप्रकरणी यशवंत एकनाथ थोरात विरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा च्या विविध कलम न्वये गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात संताप व्यक्त होत असून, आरोपी यशवंत महाराज थोरात यांना पारनेर पोलिसांनी अटक केली आहे या अशा 'भोंदू' महाराजावर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. पुढील तपास पारनेर येथील पोलीस अधिकारी करत आहेत. ढवळपुरी येथे शनिवार (दि.१४ मार्च) रोजी यशवंत महाराज थोरात यांनी अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याची घटना समोर आल्यानंतर पारनेर पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करून कारवाई करत आरोपी यशवंत महाराज थोरात यांना रविवार दिनांक १५ मार्च रोजी पहाटे चार वाजता ढवळपुरी येथून राहत्या घरातून अटक केली. न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयान` आरोपीला २० मार्च पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याच्या आदेश दिले आहेत त्यानुसार पुढील तपास पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पारनेर सहाय्यक पोलीस निरीक्षक रणजीत मारग हे करत आहेत.

# एसटीची इलेक्ट्रिक बस सेवा बंद होण्याच्या मार्गावर
## वाढत्या आर्थिक तोट्यामुळे संघटनेची शिफारस



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१५, मुंबई :** एसटी महामंडळाची लालपरी एखाद्या वर्षाचा अपवाद वगळता कायमच आर्थिक तोट्यात चालत आहे. एसटी महामंडळाने ५१५० विजेवरील बस कंत्राटी पद्धतीने भाडे तत्वावर घेण्याचा करार इव्हेट्रान्स कंपनीशी केला असून, सदर कंपनीला गाड्यांचे नवीन वेळापत्रक देऊनही अजूनही अपेक्षित बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या नसून सद्या एसटीला प्रति किलो मीटरला सरासरी अंदाजे २८ ते ३० रुपये इतका तोटा सहन करावा लागत आहे. तोट्याच्या खाईत लोटणारा हा प्रकल्प तात्काळ रद्द करण्यात आला पाहिजे अशी मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केली आहे.

मूळ करारा प्रमाणे सदर कंपनी भाडे तत्वावर दर महिन्याला २१५ बसेस देणार होती. पण वेळेत बसेस पुरविण्यात आल्या नाहीत. तोडगा म्हणून महामंडळाने सरकारच्या मध्यस्थीने कंत्राटदार कंपनीला नवीन वेळापत्रक ठरवून दिले. तरीही कंपनीने एसटीला बसेस दिल्या नाहीत. वारंवार एसटीची फसवणूक करणाऱ्या कंपनी सोबतचा करार रद्द का करण्यात आला नाही? एसटीचे व्यवस्थापन कुणाच्या दबावाखाली आहे. असा सवालही बरगे यांनी उपस्थित केला आहे.

नवीन वेळा पत्रकाप्रमाणे सदर कंपनीने एसटीला एकूण मे २०२६ पर्यंत एकूण १२८८ बसेस उपलब्ध करून देणे गरजेचे असताना आता पर्यंत ९ मीटरच्या २६० व १२ मीटरच्या ४७८ बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. एकूण फक्त ७३८ बसेस देण्यात आल्या असून दर महिन्याला १५० बसेस उपलब्ध करून देण्याचे कबूल करूनही जानेवारी व फेब्रुवारी या महिन्यात सदर कंपनीने एसटीला एकही बस उपलब्ध करून दिली नसून महामंडळाने वारंवार पत्रे लिहूनही सदर कंपनी संपर्क साधत नसून या प्रकल्पामुळे तोटा वाढत चालल्याने महामंडळाच्या चिंतेत भर पडत आहे. दिवसेंदिवस वाढत चाललेला तोटा पहिला तर प्रकल्प पूर्ण होई पर्यंतचा संभाव्य तोटा ३२०० रुपयांवर जाणार असून त्याचा होणारा व्यवहार्यता पूरक निधी सरकारने तात्काळ उपलब्ध करून दिला नाहीतर व परिस्थिती अशीच राहिली तर महामंडळ आर्थिकदृष्ट्या कोलमडून पडेल अशी भीतीही बरगे यांनी व्यक्त केली.

सदर कंपनीने एसटीला भाडे तत्वावर दिलेल्या बसेसना प्रति बस २० लाख इतकी सबसिडी सरकार देत असून आज पर्यंत रुपये ९५ कोटी इतकी रक्कम सरकारकडून एसटीला मिळाली आहे. सदर रक्कम एसटीनेही कंपनीला लगेच दिली असून सबसिडी देण्यासाठी सरकारकडे पैसे आहेत. पण संभाव्य तोट्याची ३२०० कोटी रुपये इतकी रक्कम एसटीला देण्यासाठी सरकारकडे पैसे नाहीत हा विरोधाभास असून यातून सरकारला सामान्य जनतेच्या एसटी पेक्षा पुरवठादार कंपनी महत्वाची वाटत आहे. हे दुर्दैवी असल्याचे बरगे यांनी पुढे म्हटले आहे.

# ओबीसींच्या स्वतंत्र जनगणनेसाठी २३ मार्चला दिल्लीत आंदोलन

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.१५, चिमूर :** केंद्र शासनाने देशातील इतर मागासवर्गीयांना (ओबीसी) न्याय देण्यासाठी येणाऱ्या जनगणनेत ओबीसींची स्वतंत्र जनगणना करावी, या प्रमुख मागणीसाठी येत्या २३ मार्च रोजी दिल्लीतील जंतर-मंतर येथे धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. या आंदोलनात जास्तीत जास्त ओबीसी बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्रीय ओबीसी युवा महासंघाचे विदर्भ उपाध्यक्ष श्रीहरी सातपुते यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

> ● ओबीसी समाजाची अचूक लोकसंख्या समोर येण्यासाठी स्वतंत्र जनगणना अत्यंत आवश्यक आहे. समाजाच्या हक्कांसाठी दिल्लीतील आंदोलनात युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.
>
> **– श्रीहरी सातपुते**



राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, राष्ट्रीय महासचिव सचिन राजुरकर तसेच ओबीसी समाजाच्या विविध संघटनांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडणार आहे. देशात लवकरच जनगणना होणार असून ऑक्टोबर २०२६ पासून जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये, तर उर्वरित देशात २०२७ पासून जनगणना सुरू होणार असल्याचे केंद्र शासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, जनगणना आयुक्तांनी काढलेल्या अधिसूचनेनुसार राजपत्रात ३३ प्रश्नांची सूची प्रकाशित करण्यात आली आहे. या सूचीतील १२व्या क्रमांकावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचा उल्लेख करण्यात आला असून इतरांसाठी 'अन्य' असा शब्द वापरण्यात आला आहे. मात्र त्यामध्ये ओबीसींचा स्पष्ट उल्लेख नसल्याने ओबीसी समाजात नाराजी व्यक्त होत आहे.

मागासवर्गीय ठरविण्याच्या निकषांमध्ये संबंधित जातीतील कुटुंबांची सामाजिक व आर्थिक स्थिती महत्त्वाची मानली जाते. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात प्रत्येक कुटुंबाची माहिती संकलित केली जाणार असून त्यामध्ये केवळ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व धर्म यांची नोंद होणार आहे. त्यामुळे ओबीसी समाजावर अन्याय होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर ओबीसींची स्वतंत्र जनगणना व्हावी या मागणीसाठी दिल्लीतील जंतर-मंतर येथे धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले असून विदर्भातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीहरी सातपुते विदर्भ उपाध्यक्ष, राष्ट्रीय ओबीसी युवा महासंघ यांनी केले आहे.

# स्कॉर्पिओतून बनावट देशी दारुची तस्करी उघड
## १२.१९ लाखांचा मुद्देमाल जप्त, एकाला अटक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, वरोरा (चंद्रपूर) :** वरोरा तालुक्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडाकेबाज कारवाई करत स्कॉर्पिओ वाहनातून बनावट देशी दारूची तस्करी करणाऱ्या एका तरुणाला अटक केली. या कारवाईत सुमारे १२ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल

मिळालेल्या माहितीनुसार, १३ मार्च २०२६ रोजी गुप्त माहितीच्या आधारे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने बोर्डा (ता. वरोरा, जि. चंद्रपूर) येथील प्रशांत ताजने यांच्या घरासमोरील मोकळ्या जागेजवळ सापळा रचला. या ठिकाणी एमएच-३४-सीडी-३३३६ क्रमांकाची पांढऱ्या रंगाची स्कॉर्पिओ गाडी संशयास्पद स्थितीत आढळली. वाहनाची तपासणी केली असता, गाडीत ५० खाकी रंगाच्या खोक्यांमध्ये 'रॉकेट देशी दारू संत्रा' ब्रँडच्या ९० एमएल क्षमतेच्या सुमारे ५००० सीलबंद बाटल्या आढळून आल्या. प्रत्येकी ४० रुपयांच्या एमआरपीप्रमाणे या दारूची किंमत २ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय स्कॉर्पिओ वाहन (सुमारे ९ लाख रुपये), दोन मोबाईल फोन आणि दोन नंबर प्लेट असा एकूण १२.१९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी आशीष रमेश पीटपल्लोवार (वय २३, रा. बोर्डा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर) याला ताब्यात घेण्यात आले. जप्त केलेल्या दारूचा साठा प्रथमदर्शनी बनावट असल्याचे दिसून आल्याने रासायनिक तपासणीसाठी नमुने घेऊन सरकारी सील करण्यात आले.

सदर प्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ चे कलम ६५(जे)(ई), ८१, ८३, १०३ तसेच भारतीय न्याय संहितेचे कलम १२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईचा तपास राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुय्यम निरीक्षक सचिनकुमार एच. पोलेवार करीत आहेत.

# चंद्रपूर येथे २० एप्रिलला राजमाता राणी हिराई जन्मोत्सव; संस्कृती-कला आणि परंपरेचा उत्सव

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे चंद्रपूर शहराच्या इतिहासात अढळ स्थान असलेल्या आणि गोंडवानाच्या 'शेरनी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजमाता राणी हिराई यांचा जन्मोत्सव आता चंद्रपुरात शासकीय स्तरावर अत्यंत दिमाखात साजरा होणार आहे. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांना पत्र लिहून यासंदर्भात मागणी केली होती. त्यांच्या पत्राची दखल घेत सांस्कृतिक कार्य विभागाकडून २५ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच हे शक्य झाले आहे, अशी भावना व्यक्त होत आहे.

राजमाता राणी हिराई यांच्या दूरदृष्टीपूर्ण कारभारामुळे चंद्रपूर शहराला वैभवशाली ओळख प्राप्त झाली. माता महाकाली मंदिर, राजा बिरशहा यांची समाधी अशा ऐतिहासिक वास्तू उभारून त्यांनी शहराच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेला समृद्ध केले. या दैदिप्यमान इतिहासाची ओळख नव्या पिढीला व्हावी आणि चंद्रपूरच्या सांस्कृतिक वारशाचे जतन व्हावे, या हेतूने राजमाता राणी हिराई बहुउद्देशीय सेवा समिती, चांदागडचे अध्यक्ष शांताराम उईके यांनी यासंदर्भात निधीची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्याकडे लेखी पत्राद्वारे निधीची मागणी केली. त्यांच्या या मागणीची



तातडीने दखल घेत राज्य शासनाने १२ मार्च २०२६ रोजी शासन निर्णय काढून राजमाता राणी हिराई जन्मोत्सवासाठी निधी मंजूर केला आहे.

हा निर्णय चंद्रपूरच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असून, यामुळे राजमाता राणी हिराई यांच्या गौरवशाली कार्याचा इतिहास नव्या पिढीपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचण्यास मदत होणार आहे.

**असा होणार महोत्सव !**

दि. २० एप्रिल २०२६ रोजी चंद्रपूर येथील कोहिनूर तलाव, सोमेश्वर मंदिराजवळ हा जन्मोत्सव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात संगीत, वादन आणि नृत्यासह विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. तसेच वन उत्पादन आणि हस्तकला प्रदर्शनीचेही आयोजन करण्यात येणार आहे. आ. मुनगंटीवार यांच्या या प्रयत्नांमुळे गोंडकालीन संस्कृतीला आणि स्थानिक कलाकारांना एक मोठे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

# इराण युद्ध अमेरिकेला जड जात आहे?



इराण अमेरिका युद्धाला आता पंधरा दिवस होत आले तरी हे युद्ध थांबायचे नाव घेत नाही. ज्या वेळी अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ला करून इराणचे सर्वोच्च नेते आयातूला खामेनी यांची हत्या केली तेंव्हा इराण आणि इस्रायल या देशांनी दावा केला की आम्ही इराणच्या सर्वोच्च नेत्याला संपवून टाकल्याने इराण लवकरच आम्हाला शरण येईल आणि अवघ्या काही तासात किंवा फार फार तर दोन ते तीन दिवसांत हे युद्ध संपेल.

जगालाही तसेच वाटले होते कारण अमेरिका आणि इराण यांची तुलनाच होऊ शकत नाही. अमेरिकेची शस्त्र सज्जता पाहिल्यास इराण त्यांच्यापुढे नगण्यच आहे त्यात अमेरिकेला इस्रायलची साथ त्यामुळे हे युद्ध लवकरात लवकर संपवून अमेरिका स्वतःचे मनसुबे पूर्ण करेल असेच सर्वांना वाटले होते पण झाले उलटेच. आयातूला खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराणने अमेरिकेला जशास तसे उत्तर देण्याचे ठरवले. इराणने अमेरिका इस्रायलला त्यांच्याच भाषेत उत्तर देऊन या दोन्ही देशांना जेरीस आणले. इतक्यावरच इराण थांबला नाही तर इराणने ज्या आखाती देशात अमेरिकेचे लष्करी तळ आहेत तिथे हल्ला करुन ते नष्ट केले आणि अमेरिकेला हिसका दाखवला. इराण अमेरिकेचा इतका कडवा प्रतीकार करेल असे कोणालाही वाटले नव्हते खुद्द ट्रम्प यांनाही तसे वाटले नव्हते पण आता त्यांना त्याची जाणीव झाली असावी म्हणूनच ते आता युद्ध थांबवण्याची भाषा करत आहे. हे युद्ध अपेक्षेपेक्षा जास्त लांबले त्यामुळे ट्रम्प यांच्यावर अमेरिकेतूनही टीका होऊ लागली आहे. त्यात इराणने हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्याने या समुद्राधुनीमार्गे जगात होणारा इंधन पुरवठा थांबल्याने अनेक देशांनी रशियाकडून इंधन विकत घेतले

रशियाने चढ्या दरात इंधनविक्री सुरू केली त्यामुळे रशियाच गब्बर होऊ लागली. याचाच अर्थ इराण अमेरिका युद्धाचा खरा लाभार्थी रशिया ठरला. दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ म्हणतात ते यालाच. भारतासह अनेक देशांनी रशियाकडून इंधन खरेदी करू नये यासाठी टेरीफ लावून ब्लॅकमेल करणाऱ्या ट्रम्प यांनाच त्या देशांना रशियाकडून इंधन खरेदी करा असे सांगावे लागले एकप्रकारे ट्रम्प यांचा हा अपमानच आहे. हे युद्ध जितके लांबेल तितकी त्याची जगाला किंमत मोजावी लागेल. या युद्धाचे परिणाम जगातील अनेक देशांवर होऊ लागले आहे.

अनेक देशात गॅस आणि इंधन तुटवडा निमर्ण झाला आहे. गॅस आणि इंधन तुटवड्यामुळे सर्वसामान्यांच्या जगण्यामरण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. हे युद्ध अमेरिकेने लादले असल्याने जगभर ट्रम्प यांचा निषेध व्यक्त केला जात आहे. खुद्द अमेरिकेतही ट्रम्प यांचा मोठ्या प्रमाणात निषेध व्यक्त व्यक्त होत आहे. ट्रम्प यांच्या निषेधासाठी अमेरिकन नागरिक रस्त्यावर उतरत आहे. एकीकडे ट्रम्प यांचा निषेध केला जात असतानाच दुसरीकडे इराणच्या प्रति जगाची सहानुभूती वाढत चालली आहे. एकूणच हे युद्ध ट्रम्प यांना जड जात असून आता हे युद्ध लवकरात लवकर संपवण्याची त्यांची मानसिकता बनली आहे. अर्थात इराण याला सहजासहजी संमती देईल असे वाटत नाही त्यामुळे ट्रम्प यांनी हे युद्ध लवकर संपेल असे म्हटले असले तरी तसे होईलच असे कोणीही ठामपणे सांगू शकत नाही.

**– श्याम ठाणेदार**

# हरीश राणाची डोळ्यात पाणी आणणारी कहाणी...?

भारतात सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांनाही भावूक करणारा निकाल नुकताच एका अतिशय महत्त्वाच्या याचिकेवर सुनावण्यात आला. देशासाठी हा एक ऐतिहासिक निकाल असून सर्वोच्च न्यायालयाने पहिल्यांदाच 'पॅसिव्ह यूथेनेशिया' ला परवानगी दिली आहे. गेल्या १३ वर्षांपासून कोमामध्ये असणाऱ्या एका ३२ वर्षीय हरीश राणा नामक तरुणासाठी न्यायालयाने हा निकाल सुनावला असून, मागील दशकभरातून अधिक काळापासून रुग्णालयातील यंत्रणा, नळ्या, सुया आणि औषधांच्याच मदतीने तो एक एक दिवस ढकलत होता. मात्र आता मुलाच्या या मरणासन्न अवस्थेला पाहून काळीज तिळतिळ तुटणाऱ्या वडिलांची हाक ऐकत न्यायालयान हरीशची 'लाईफ सपोर्ट सिस्टीम' हटवण्यास परवानगी दिली आहे.

२०१८ च्या 'कॉमन कॉज जजमेंट'वर हा निकाल आधारित असून, यामध्ये 'पूर्ण सन्मानाने मरणाच्या अधिकारास' मान्यता देत न्यायालयाने हा निकाल सुनावला. वरील दिशानिर्देश लागू करण्याची ही पहिलीच वेळ असल्याचेही न्यायालयाने सुनावणीदरम्यान स्पष्ट केले. हरीष राणा इच्छामृत्यूप्रकरणी सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती पारदीवालासुद्धा भावूक झाले होते.हरीश राणाची डोळ्यात पाणी आणणारी कहाणी? हरीश राणा एक अतिशय चाणाक्ष आणि शैक्षिणिक क्षेत्रात उत्तम कामगिरी करणारा तरुण होता. २०१३ मध्ये पेइंग गेस्ट हॉस्टेलच्या चौथ्या मजल्यावरून तो पडला आणि तिथेच त्याचे आयुष्य वेगळ्या वळणावर गेले. मेंदूला अतिशय गंभीर स्वरुपातील दुखापत झाल्यामुळे तो लगेचच 'पर्मनंट वेजिटेटिव्ह स्टेट'मध्ये गेला आणि त्याचे शरीर १०० टक्के म्हणजेच पूर्णतः 'काड्रिप्लेजिक' झाले. गेल्या १३ वर्षांपासून त्याच्या प्रकृतीत कोणतीच सुधारणा झाली नाही. 'ट्रेकियोस्टॉमी ट्यूब'ने तो श्वास घेत



होता आणि पोटात असणाऱ्या 'पीईजी ट्यूब'च्या मदतीने 'क्लिनिकली एडमिनिस्टर्ड न्यूट्रिशन (CAN)' च्या स्वरुपात त्याचा अन्नरुपी पोषण दिले जात होते. डॉक्टरांनीची त्याच्या सुधारणेसंदर्भातील आशा सोडल्या होत्या. इतकेच नव्हे तर, त्याच्या शरीरावर अनेक जखमा झाल्याचेही काही वृत्तांमध्ये सांगण्यात आले आहे.

**वडिलांनी नाईलाजाने मुलासाठी मागितले इच्छामरण !**

वर्षानुवर्षे अंथरुणाला खिळलेला मुलगा पाहून हरीशच्या वडिलांच्या काळजावर रोजच घाला घातला जात होता. अखेर त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले. २०२४ मध्ये त्यांनी दिल्ली उच्च न्यायालयात यासाठी न्याय मागितला मात्र, तिथे अपेक्षित उत्तर न मिळाल्याने त्यांनी हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात नेले, ज्यानंतर न्यायालयाने या प्रकरणासाठी दोन वैद्यकिय समिती स्थापन केल्या ज्यामध्ये एम्समधील तज्ज्ञांचाही समावेश होता. दोन्ही समितींनी दिलेल्या निर्णयानुसार हरीशच्या प्रकृतीत सुधारणा होणार नव्हत्या. उपचार सुरू ठेवणे म्हणजे फक्त त्याच्या 'बायोलॉजिकल एक्जिस्टेंस'ला पुढे ढकलणे ज्यातून काहीही सराकारात्मक बदल होणार नाही, असे नोंदवत लाईफ सपोर्ट सिस्टीम बंद करण्यावरच आई-वडिलांसह समितीचेही एकमत झाले. ज्यानंतर न्यायमूर्ती जेबी पारदीवाला यांनी अहवालाचा आधार घेत माहिती अत्यंत दुःखद असून या तरुणाला असे ठेवले जाऊ शकत नाही, असे म्हणत हे प्रकरण संपूर्ण सन्मानाने पूर्णत्वास नेण्याच्या सूचना दिल्या.

भारतात २०११ मध्ये 'अरुणा शानबाग विरुद्ध भारत सरकार' या खटल्याच्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत दुर्मिळ आणि अपवादात्मक प्रकरणांमध्ये 'पॅसिव्ह इच्छामरणाला' कायदेशीर मान्यता दिली होती. अरुणा शानबाग या मुंबईतील केईएम हॉस्पिटलमध्ये परिचारिका होत्या, ज्या लैंगिक अत्याचारांनंतर ४० हून अधिक वर्षे 'व्हेजिटेटिव्ह स्टेट'मध्ये होत्या.

**न्यायालयाने दिलेले आदेश..**

- हरीशला दिले जाणारे सर्व जीवनरक्षक उपचार, उअछ तातडीने बंद करावेत.
- AIIMS ने लगेचच पेलिएटीव्ह केअर सेंटरमध्ये हरीशला आणत तिथून त्याला घरी पाठवण्याची सोय करावी. उपचार यंत्रणा बंद करताना रुग्णाच्या सन्मानाला कुठेही धक्का पोहोचणार नाही याची काळजी घ्यावी.
- ज्यूडिशियल मजिस्ट्रेट्सना उच्च न्यायालयांनी वैद्यकिय समितीच्या निर्णयाची माहिती द्यावी
- न्यायालयाने सदर प्रकरणांमध्ये व्यापक कायदा तयार करण्याची शिफारस केंद्राकडे केली.

**– ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी,**
**कागल–कोल्हापूर**

## सामान्य..

असून ताणतणाव
करतनाहीत मान्य
देत राही भरवसा
स्थिती ही सामान्य

घोटाळी पांढरे ढग
म्हणे पडेल पर्जन्य
भिऊनको पाठीशी
दावे प्रेमळसौजन्य

होई सारे ऑलवेल
पासबुकबाकीशून्य
सहायतेचे प्रतिक्षेत
दुबळेअसहाय दैन्य

भूक उद्याही असेलं
राखून ठेवावे धान्य
तिजोरी भलीखाली
बचती द्यावे प्राधान्य

रिकामे असता हात
महान दाता वदान्य
लढा स्थिती विरूद्ध
मनात उसळे चैतन्य

जगभर अ स्वस्थता
सर्वं हो छिन्नविछिन्न
कशी राहणार सांगा
आपली स्थितीभिन्न

एकजुटीच्यालढाईंत
मनांत नको मालिन्य
युध्दा विजय दाखवू
पवित्र संबंधअन्योन्य

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# पाणी वाचवा !

## वाचक पत्र

फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीपासूनच यंदा उन्हाच्या झळा अनुभवायला येऊ लागल्या आहेत. यापूर्वी कधीही न अनुभवलेला उकाडा यंदा राज्यासह देशभरातील नागरिकांना भोगावा लागणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत पाण्याची मोठ्या प्रमाणात गरज भासते आणि याच दिवसांत नद्या, तळी, विहिरी कोरड्या पडू लागतात. ज्याचा परिणाम मानवी जीवनावर तर होतोच शिवाय पशु-पक्ष्यांचेही जीवनमान धोक्यात येते. आगामी काळात जगायचे असेल, तर आज पाण्याची बचत करणे अनिवार्य झाले आहे. बऱ्याचदा शेजारी पाजारी अन्य कोणी पाण्याची बचत करताना दिसत नाहीत, मग मीच का पाणी वाचवावे, असे विचार मनात येतात: मात्र शेजारची व्यक्ती पैशाची उधलपट्टी करते म्हणून त्याचे पाहून आपण ती करत नाही, कारण पैशाचे महत्व, पैसे वाचवण्याचे महत्व, पैसे कमावण्यासाठी लागणारी मेहेनत याबाबतची आपल्या प्रत्येकाला आहे.

आज पाणी सहज उपलब्ध होत आहे याचा अर्थ भविष्यातही ते सहज उपलब्ध होईलच असे नाही. त्यामुळे पाण्याच्या बचतीचे महत्वही आपण लक्षात घ्यायला हवे. आपल्या लहान सहान कृतीतून पाण्याची बचत आपल्याला करता येते. पाणी वाचवणे म्हणजे अस्वछ राहणे असे मुळीच नव्हे,आपल्या दैनंदिन स्वच्छतेसाठी उदा. आंघोळ, तोंड धुणे, हात धुणे आणि अन्य स्वच्छतेसाठी किती पाणी आपण व्यय करतो हें प्रत्येकाला ज्ञात असते. त्यामध्येही उन्हाळ्यात जर आपण शॉवरचा वापर करत असू तर बादलीचा वापर करून कित्येक लिटर पाणी आपण वाचवू शकतो, हात धुताना हाताला हँडवॉश अथवा साबण लावेपर्यंत आपण नळ चालूच ठेवत असू तर तो बंद करायला हवा. कपडे आणि भांडी धुतांनाही हाच नियम पाळूया. भांड्यांना साबण लावताना नळ बंद ठेवूया. पिण्यासाठी आवश्यक तेव्हढेच पाणी घेऊया, जेणेकरून पाणी पिऊन झाल्यानंतर पेल्यात उरलेले पाणी अन्यत्र टाकावे लागणार नाही.

कपडे धुण्यासाठी आणि भांडी घासण्यासाठी शक्य असल्यास काही दिवस यंत्राचा वापर न करता हाताने धुण्याचा प्रयत्न करूया. घरातील एखादा नळ बिघाड झाल्याने त्यातून पाणी गळत असेल, तर तो तत्परतेने दुरुस्त करून घेऊया. झाडांना आवश्यक तेव्हढेच पाणी देऊया. एखाद्या ठिकाणी पाईपलाईनमधून पाण्याची गळती होत असेल तर त्वरित पाणी खात्याला कळवून त्या ठिकाणी दुरुस्ती करून घेऊया. पाणी वाचवण्याचे महत्व आपल्या घरातील लहानग्यांनाही सांगुया. आपण जर सोसायटीत राहत असू तर सोसायटीची मिटिंग घेऊन पाणी वाचवण्याचे प्रयत्न सामूहिकपणे करण्याचा प्रयत्न करूया! पाण्याला जीवन असे म्हटले जाते.

फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये महागडे जेवण जेवल्यानंतरही ते पचण्यासाठी जेवणांनंतर किमान ग्लासभर पाणी तरी आपल्याला हवेच असते. पाण्याविना जीवनाची आपण कल्पनाही करू शकत नाही. काही देशांमध्ये पाणीटंचाईमुळे इंधनाच्या दरात पाणी विकले जात असल्याच्या बातम्या आजवर आपण वाचल्या आहेत. आज आपण पाणी नाही वाचवले तर भविष्यात भारततही अशीच परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यासाठी पाणी वाचवण्याची सवय आतापासून अंगवळणी पाडूया !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# युद्धामुळे कोणाचाही फायदा नाही !



दुसरे महायुद्ध अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या शहरावर अणुबाँब चा हल्ला करून संपविले. या घटनेमुळे जपानमधील लाखो लोक मृत्यूमुखी पडले. कित्येक जायबंदी झाले. यातून परत उभे राहण्यासाठी जपानला अनेक वर्षे मेहनत करावी लागली. आज गेली सुमारे पंधरा दिवस अमेरिका -इस्त्रायल विरुद्ध इराण असे युद्ध चालू आहे. या युद्धात इराण तसेच अमेरिका व इस्त्रायलची हानी झाली आहे. आज तरी या युद्धात माघार घ्यावयास कोणी तयार नाही. युद्धात अनेक जीव गेले. इराणमधील अनेक शाळांमधील निष्पाप मुलांचा मृत्यू झाला. त्या मुलांची काय चूक होती ? या युद्धामुळे अनेक देशात गॅस टंचाईचे संकट सुरु झाले आहे.

त्याचे परिणाम अगदी घरा घरा पर्यंत पोहचले आहेत. अनेक भागातील हॉटेल्स बंद होत आहेत. त्याचा फटका गरीब लोकांना होणार आहे. महागाई वाढत चालली आहे. हळू हळू जीवनावश्यक वस्तूंची टंचाई भासू लागेल. प्रवास कमी होणार आहे. इतकेच काय पण रेल्वेनी लांब जाण्याला सुद्धा लोक तयार होणार नाहीत इंधन टंचाईमुळे विमानांचे भाडे वाढले आहे. दवाखाने, मोठी हॉस्पिटल्स यामधील परिस्थिती फारच गंभीर होत चालली आहे. विशेष म्हणजे अनेक लोकांचे शेअर्सचे भाव कमी झाल्यामुळे नुकसान होईल. विदेशी निर्यातीत अडथळे निर्माण झाल्यामुळे काही वस्तूंचे भाव कमी होतील. याचा मोठा तोटा शेतकऱ्यांना बसेल. या युद्धाचा फायदा मात्र जे कारखाने शस्त्रास्त्र निर्मिती करतात यांना होईल.

आज अमेरिका युद्धावर प्रचंड खर्च करत आहे एका बातमीनुसार. गेल्या दोन दशकात अमेरिकेने युद्धावर खर्च केलेला पैसा भारताच्या अर्थव्यस्थेच्या दुप्पट आहे. युद्धासाठी खर्च होणारा पैसा त्या त्या देशातील लोकांच्या करातून येतो. साहजिकच विकास तसेच नवीन प्रकल्प यावर खर्च होणारा पैसा युद्धासारख्या विनाशावर खर्च होतो. १९२ देशांची राष्ट्रसंघ ही जागतिक संस्था शांततेसाठी आहे पण मोठी राष्ट्रे यातून बाजूला आहेत असे चित्र आहे. त्यामुळे या संस्थेला शांततेसाठी फारशी कामगिरी करता येत नाही. मग या युद्धाचा शेवट काय होणार? हेच प्रश्न जगातील अनेक शांतता प्रेमी नागरिकांपुढे उभे आहेत.

**– शांताराम वाघ, पुणे.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## संसदेच्या पवित्र परंपरेचा अवमान करणाऱ्या काँग्रेस पक्षाच्या विरोधात भाजपचे निषेध आंदोलन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, बुलडाणा :** लोणार : दिनांक १२ मार्च २०२६ रोजी संसदेत केंद्रीय अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना संसदेच्या मकर प्रवेशद्वाराबाहेर काँग्रेस नेते व त्यांच्या सोबतच्या विरोधी पक्षांच्या खासदारांनी 'चायपार्टी' आंदोलन करत संसद व संसदीय परंपरांचा अपमान केला.

लोकशाहीची सर्वोच्च संस्था असलेल्या संसदेला पार्लमेंट पिकनिक स्पॉट बनविण्याचा हा प्रकार अत्यंत निषेधार्ह असून संसदीय नियम व लोकसभा अध्यक्षांच्या सूचनांचेही उल्लंघन करण्यात आले आहे.संसद ही देशातील सर्वोच्च लोकशाही संस्था असून तिचा अवमान करणारे कृत्य अत्यंत निषेधार्ह आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान काँग्रेस नेते व त्यांच्या सहकाऱ्यांनी संसद परिसरात केलेल्या 'चाय पार्टी'द्वारे लोकशाही संस्थांचा अवमान केला आहे. तसेच घरगुती गॅस दरांबाबत जनतेमध्ये संभ्रम निर्माण करून खोटा प्रचार करण्याचा प्रयत्नही काँग्रेसकडून सुरू आहे.या सर्व प्रकारांचा निषेध नोंदवत आज आंदोलनाद्वारे काँग्रेसच्या दिशाभूल करणाऱ्या राजकारणाचा तीव्र निषेध करण्यात आला. यावेळी विजय मापारी, शहर अध्यक्ष शुभम बनमेरु, शुभम देसाई, प्रमोद वराडे, राजेंद्र डोळे, शुभम भगत, विनोद थोरवे, विजय दराडे, अजिम खान, अ‍ॅड.शिवाजी सानप यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## हिंदू दिनदर्शिकेचे मुंबईच्या महापौर रितूताई तावडे यांच्या हस्ते प्रकाशन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, मुंबई :** बाजारात मिळणाऱ्या बहुतांश दिनदर्शिका सौर कालगणनेनुसार १ जानेवारी ते ३१ डिसेंबर अशा तयार केलेल्या असतात. आर्थिक वर्षाची सुरुवात १ एप्रिलपासून होत असल्याने त्या क्षेत्राशी संबंधित आस्थापने १ एप्रिल ते ३१ मार्च अशा दिनदर्शिका प्रकाशित करतात. कुर्ल्यातील नववर्ष स्वागत यात्रा समितीने मात्र या सर्वांना छेद देऊन शालिवाहन शक अर्थात हिंदू नववर्ष सुरु होते.

त्या चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून म्हणजेच गुढीपाडवा ते फाल्गुन अमावस्या अशी दिनदर्शिका तयार केली आहे. जगातील सर्वात प्राचीन आणि प्रगत अशा हिंदू संस्कृतीचे, ऋषी-मुनींनी मांडलेल्या प्रगत कालगणनेचे तसेच तिथीनुसार येणारे सण, धार्मिक उत्सव आणि व्रते यांचे महत्व हिंदूंना कळावे, हिंदूंनी त्यांचे वाढदिवस आदी विधी तिथीनुसार साजरे करावेत आणि तिथींचे महत्व त्यांनी पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवावे हा यामागील प्रमुख उद्देश आहे.

या अभिनव संकल्पनेचे यंदाचे दुसरे वर्षे आहे. गतवर्षी भारताचार्य सु.ग.शेवडे यांच्या शुभहस्ते दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले होते. हिंदु कालगणनेनुसार बनविण्यात आलेल्या या दिनदर्शिकेमध्ये वर्षभरात येणाऱ्या हिंदू तिथी, सण, धार्मिक उत्सव, व्रते ठळकपणे मांडण्यात आले आहेत. यंदाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन मुंबईच्या महापौर रितूताई तावडे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. यावेळी मुंबईतील टिळक नगर येथील नगरसेवक सुषम सावंत आणि समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. हिंदू दिनदर्शिकेचे स्वागतमूल्य रु. २५ ठेवण्यात आले असून ज्यांना दिनदर्शिका घरपोच हवी आहे त्यांनी ९५२४४०००७० या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन नववर्ष स्वागत यात्रा समिती, कुर्ला यांनी केले आहे.

## श्री शिवाजी विद्यालय बुलढाणा येथे पालक सभा संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, बुलडाणा :** श्री शिवाजी विद्यालय बुलढाणा येथे दिनांक १४ मार्च शनिवारी पालक सभा संपन्न झाली. या पालक सभेचे अध्यक्ष म्हणून शाळेचे प्राचार्य कावरे सर हे होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये शाळेची प्रभारी पर्यवेक्षक ढोमणे सर शिक्षक प्रतिनिधी तथा ज्युनिअर कॉलेज प्रमुख भोंडे सर व पालक प्रतिनिधी श्री खरात हे उपस्थित होते. पालक व शिक्षकांचा सुसंवाद साधण्यासाठी पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या पालक सभेला इयत्ता पाच ते नऊ मध्ये शिकणारे विद्यार्थ्यांचे पालक प्रामुख्याने उपस्थित होते. सुरुवातीला पालकर सर यांनी मागील पालक सभेचे इतिवृत्तांत वाचून दाखवले या सभेला उपस्थित असणारे पालक प्रतिनिधी श्री खरात यांनी श्री शिवाजी विद्यालय बुलढाणा येथील विद्यार्थ्यांसाठी पुढील वर्ष जो युनिफॉर्म चेंज होणार आहे. याबद्दल पालकांच्या वतीने सहमती व स्वागत करण्यात आले.

या पालक सभेला उपस्थित असणाऱ्या अनेक पालकांनी आपले मत मांडले. यामध्ये पाटील साहेब, पांढरे साहेब यांनी शाळेमध्ये जे नवीन उपक्रम सुरू केले आहे त्याबद्दल आनंद व्यक्त केला व शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. साक्षी टिकार आपले मत मांडत असताना विद्यार्थ्यांची शिस्त व खेळामध्ये विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सहभाग कसं करून घेता येईल याचा प्रयत्न करण्यास सांगितला शिक्षक प्रतिनिधी भोंडे सर यांनी दहावीनंतर अकरावीसाठी शाळेमध्ये घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा विषय मार्गदर्शन केले. शाळेचे पर्यवेक्षक ढोमणे सर यांनी शाळेमध्ये अभ्यासाबरोबरच कोणकोणते उपक्रम घेतले जातात व उन्हाळ्यामध्ये घेण्यात येणाऱ्या शिबिराविषयी मार्गदर्शन केले शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष भाषणातून कावरे सर यांनी शाळेमध्ये घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा व विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या कलागुणांना वाव देण्यासाठी घेण्यात येणारे उपक्रम याबद्दल पालकांना सांगितले.

तसेच पुढील शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाबरोबरच व खेळ सांस्कृतिक कार्यक्रम ांचे नियोजन कसे केलं आहे हे पालकांना सांगितले तसेच शाळेमार्फत शाळा आपल्या दारी हा उपक्रम प्रत्येक गावागावांमध्ये घेऊन पालकांशी संवाद साधायचा आहे हे सांगितले. या कार्यक्रम ाला पालक शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पालकर सर यांनी केले कार्यक्रमाची छायाचित्रण वाघ सर यांनी केले.

## विंचूर-येवला राज्यमार्गाचे काम 'तीन पाटी'पर्यंत; एक बाजू वाहतुकीसाठी बंद !

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१५, विंचूर (नाशिक) :** विंचूर - पिंपळस ते येवला या राज्यमार्गाच्या सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. हे काम आता विंचूर येथील 'श्रीराम चौक' (तीन पाटी) परिसरापर्यंत येऊन पोहोचले असून, सुरक्षिततेचा उपाय म्हणून येवल्याकडे जाणारी एक बाजू आज सकाळपासून वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आली आहे.

रस्त्याच्या एका बाजूचे काम सुरू झाल्याने प्रशासनाने वाहतुकीत म हत्त्वाचे बदल केले आहेत. येवल्याकडे जाणारी आणि येणारी अशी दोन्ही



बाजूंची वाहतूक आता केवळ एकाच बाजूने (एकेरी) वळवण्यात आली आहे. यामुळे या भागात काही प्रम ाणात वाहतुकीचा वेग मंदावला आहे.

**नागरिकांनी सहकार्य करावे : सरपंच सचिन दरेकर**

या संदर्भात बोलताना विंचूरचे सरपंच सचिन रत्नाकर दरेकर यांनी नागरिकांना प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणाले की, रस्त्याचे काम दर्जेदार व्हावे आणि ते वेळेत पूर्ण व्हावे, यासाठी सर्वांचे सहकार्य गरजेचे आहे. वाहनधारकांनी घाई न करता, प्रशासनाने लावलेल्या दिशादर्शक फलकांचे काळजीपूर्वक वाचन करूनच मार्गक्रमण करावे.

यामुळे वाहतूक कोंडी होणार नाही आणि संभाव्य अपघात टाळता येतील.

**वाहनधारकांसाठी महत्त्वाच्या सूचना :**

**वेग मर्यादा पाळा :** विंचूर तीन पाटी परिसरातून जाताना वाहनाचा वेग मर्यादित ठेवावा.

**ओव्हरटेक टाळा :** एकेरी वाहतूक सुरू असल्याने ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न करू नये, ज्यामुळे अपघात टळतील.

**वेळेचे नियोजन :** कामामुळे वाहतूक धिम्या गतीने सुरू असल्याने प्रवासासाठी अतिरिक्त वेळ हातात ठेवावा किंवा शक्य असल्यास पर्यायी मार्गाचा वापर करावा.

## अनुदानाकरिता दिव्यांगांना वैश्विक ओळखपत्र अनिवार्य !

### ओळखपत्र आधारसोबत संलग्न करणेही अनिवार्य, चिमूर तहसीलदारांचे आवाहन

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.१५, चिमूर (चंद्रपूर) :** विशेष सहाय्य योजनेच्या दिव्यांग शासनाकडून मिळणारे रुपये २ हजार ५०० रुपये प्रमाणे अनुदान नियतिम सुरू ठेवण्याकरिता शासन नियमानुसार दिव्यांग वैश्विक ओळखपत्र क्रमांक असणे अनिवार्य आहे. असे आवाहन तहसीलदार श्रीधर राजमाने यांनी केले आहे.

तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या दिव्यांग लाभार्थ्यांचे डीबीटीमार्फत अनुदान सुरू आहे. बऱ्याच लाभार्थ्यांनी दिव्यांग वैश्विक ओळखपत्र क्रमांक तहसील कार्यालयात सादर केलेले नाही. त्या लाभार्थ्यांनी दिव्यांग वैश्विक ओळखपत्र सादर करावे. तसेच ज्या लाभार्थ्यांनी अजूनपर्यंत दिव्यांग वैश्विक ओळखपत्र क्रमांक काढलेले नाही, अशा दिव्यांग लाभार्थ्यांनी दिव्यांग वैश्विक ओळखपत्र क्रमांककरिता




जवळच्या महा-ई-सेवा केंद्रात ऑनलाइन अर्ज करून जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे प्रत्यक्ष जाऊन तपासणी करून आपले दिव्यांग वैश्विक ओळखपत्र प्राप्त करून घेऊन या कार्यालयात सादर करावे तत्पूर्वी ऑनलाईन अर्ज सादर केल्याची पोच पावती तहसील कार्यालय चिमूर येथे सादर करावी.

**ओळखपत्र आधारसोबत सलग्न करणेही अनिवार्य !**

प्रशासकीय सूचनेनुसार, दिव्यांग लाभार्थ्याने दिव्यांग वैश्विक ओळखपत्र क्रमांक कार्यालयात जमा करून चालणार नाही तर दिव्यांग वैश्विक ओळखपत्र क्रमांक आधार कार्डसोबत सलग्न करणेही अनिवार्य आहे.

यासाठी दिव्यांग लाभार्थ्यांनी जवळच्या महा-ई-सेवा केंद्रात जाऊन आधार - दिव्यांग वैश्विक ओळखपत्र क्रमांक लिंकची प्रक्रिया पूर्ण करुन घ्यावी, असे आवाहन तहसीलदार श्रीधर राजमाने यांनी केले आहे. दिव्यांग वैश्विक ओळखपत्र क्रमांक अर्जाची पोच पावती ७ दिवसात सादर न केल्यामुळे आपले अनुदान बंद झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थ्यांची राहील याची नोंद लाभार्थ्यांनी घ्यावी, असे बजावण्यात आले आहे.

## मुंबईच्या बोरिवली संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात ५ वर्षांनी पुन्हा धावली वनराणी

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१५, मुंबई :** संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वनराणीचे पुनरागमन हे केवळ पर्यटनाचे आकर्षण नसून समस्त मुंबईकरांच्या बालपणाच्या आठवणी पुन्हा जिवंत करणारा अनुभव ठरत आहे. २०२१ मध्ये आलेल्या तौक्ते चक्रीवादळामुळे वनराणीला मोठे नुकसान झाले होते. त्यानंतर ही सेवा बंद होती.

समस्त मुंबईकरांच्या बालपणाशी जोडलेली 'वनराणी' खेळणी रेल्वे पाच वर्षांच्या विश्रांतीनंतर पुन्हा धावू लागली आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात शनिवारी केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्या हस्ते या रेल्वेचे लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रम ाला महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांच्यासह उद्यान संचालिका अनिता पाटील आणि स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.लल होताच उद्यानात आलेल्या मुलांचा आनंद ओसंडून वाहत होता. अनेक लहानग्यांनी गोयल यांच्यासह वनराणीची सफर करत जंगलातील हिरवाईचा आनंद घेतला. पालकांसाठीही ही सफर मुलांना निसर्गाच्या अधिक जवळ नेणारी ठरत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

उद्यानाला जागतिक दर्जाचे पर्यटन केंद्र बनविण्याच्या दृष्टीने पुढील काळात विविध उपक्रम राबविण्याची योजना आहे. त्यात कान्हेरी गुफा या ऐतिहासिक स्थळाचा वारसा पर्यटन म्हणून विकास, विद्युत वस, विद्युत बग्गी, सायकलिंग उपक्रम आणि उद्यानातील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा यांचा समावेश आहे. १९७० च्या दशकापासून जंगलाची राणी' म्हणून ओळखली जाणारी वनराणी अनेक पिढ्यांच्या आठवणीशी जोडलेली आहे.

तिचे पुनरागमन हे केवळ पर्यटनाचे आकर्षण नसून मुंबईकरांच्या बालपणाच्या आठवणी पुन्हा जिवंत करणारा अनुभव ठरत आहे. २०२१



मध्ये आलेल्या तौक्ते चक्रीवादळामुळे वनराणीला मोठे नुकसान झाले होते. त्यानंतर ही सेवा बंद होती. आता तिचे आधुनिकीकरण करून पुन्हा सुरू करण्यात आले असून त्यामुळे उद्यानातील पर्यटनाला नवे बळ मि ळणार आहे. नव्या वनराणी मध्ये पर्यावरणपूरक बॅटरीवर चालणारे इंजिन, आधुनिक डबे आणि सुधारित सुरक्षा व्यवस्था बसविण्यात आली आहे.

विशेष म्हणजे 'वारसा' आणि 'दृश्य घुमट' प्रकारचे डबे असल्याने प्रवाशांना जंगलातील निसर्गरम्य दृश्यांचा विस्तीर्ण अनुभव घेता येणार आहे. त्यामुळे म ुलांसह पर्यटकांना जंगलातून फिरण्याचा वेगळाच आनंद मिळणार आहे. यावेळी बोलताना गोयल म्हणाले, खेळणी रेल्वे पुन्हा सुरू करण्याचा उद्देश मुलांना आणि कुटुंबांना आनंद देणे हा आहे. पर्यटकांचा अनुभव अधिक समृद्ध व्हावा यासाठी विशेष रचनेचे डबे तयार करण्यात आले.

## लोहारडोंगरी लोहखनिज प्रकल्पाविरोधातील उपोषणाला पालकमंत्री व आ.जोरगेवार यांची भेट

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** वन्यजीव व पर्यावरणासाठी घातक ठरण्याची शक्यता असलेल्या 'लोहारडोंगरी' लोहखनिज प्रकल्पाच्या विरोधात इको-प्रो संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बंडू धोतरे यांनी सुरु केलेल्या उपोषण आंदोलनाला जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.प्रा. अशोक उईके आणि आ.किशोर जोरगेवार यांनी भेट देऊन आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. यावेळी शासन पातळीवर या विषयावर सकारात्मक भूमिका घेतली जात असल्याचे सांगत संबंधित मागण्यांकडे गांभीर्याने लौक्ष दिले जाईल, अशी ग्वाही देण्यात आली. त्यानंतर बंडू धोतरे यांनी आपले उपोषण आंदोलन मागे घेतले आहे. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा यांचीही उपस्थिती होती.

दरम्यान, राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात बोलताना आ.किशोर जोरगेवार यांनी लोहारडोंगरी लोहखनिज खाण प्रकल्प रद्द करण्यात यावा, अशी ठाम मागणी केली. चंद्रपूर जिल्ह्यात प्रस्तावित असलेल्या या प्रकल्पामुळे जंगल क्षेत्रावर परिणाम होण्याची तसेच वन्यजीवांच्या अधिवासाला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी

**बंडू धोतरे यांचे उपोषण मागे...**




सभागृहात मांडले. स्थानिक नागरिकांच्या भावना आणि पर्यावरणीय बाबींचा विचार करुन शासनाने योग्य निर्णय घ्यावा, असेही त्यांनी सभागृहात सांगितले होते.

आ.किशोर जोरगेवार यांनी सांगितले की, लोहारडोंगरी येथे सुमारे ३५ ते ३६ हेक्टर क्षेत्रात खाण प्रकल्प प्रस्तावित आहे. हा परिसर ताडोबा आणि घोडाझरी दरम्यान वाघांसाठी अत्यंत महत्वाचा कॅारिडोर मानला जातो. अशा ठिकाणी उत्खननाला परवानगी दिल्यास वाघांचा अधिवास बाधित होऊन वाघ- मानव संघर्ष वाढण्याची शक्यता आहे, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली.

चंद्रपूर जिल्ह्यात मागील काही वर्षात वाघ-मानव संघर्षात २०० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्याची बाबही त्यांनी सभागृहात मांडली. त्यामुळे पर्यावरण व वन्यजीव संवर्धनाचा विचार करुन बा प्रकल्प रद्द करण्याची मागणी त्यांनी केली हेती.

यावर उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी स्पष्ट केले होते की, सदर खाण प्रकल्पाला अद्याप कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही. तसेच हे प्रकरण सध्या न्यायालयीन प्रक्रियेत असून या प्रकल्पाला मंजूरी देण्याता शासनाचा कोणताही मानस नसल्याचे त्यांनी सभागृहात सांगितले.

दरम्यान, आज आंदोलनकर्ते बंडू धोतरे यांच्याशी या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. शासनाची भूमिका त्यांना समजावून सांगण्यात आली. आ. किशोर जोरगेवार यांनी मुंबई येथे वनमंत्री गणेश नाईक यांची भेट घेऊन या विषयावर चर्चा केली हेती. त्या चर्चेची माहितीही बंडू धोतरे यांना देण्यात आली. त्यानंतर बंडू धोतरे यांनी आपले आंदोलन मागे घेतले आहे.

# सद्गुरू किसनबाबा चौरे यांच्या पुण्यतिथी निमित्ताने पारनेर शहरात फुलणार भक्तीचा मळा

## महाराष्ट्रातील नामवंत शाहिरांच्या शाहिरीने कडाडणार ढोलकी, डफ तुणतुणे

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, पारनेर (अहिल्यानगर)** : श्री.सत्य अविनाश पारखपद समाज पारनेर आयोजित ,सालाबाद प्रमाणे या ही वर्षी प.पु.सद्गुरू आत्मज्ञानी गणपत बाबा चौरे यांचे ज्येष्ठ नातू व सद्गुरु ब्रह्मनिष्ठ हरिदास महाराज चौरे यांचे चिरंजीव परमपूज्य सद्गुरु किसन बाबा चौरे यांचा २२ वा पुण्यतिथी सोहळा पारनेर जामगाव रोड येथील आत्मज्ञानी गणपत बाबा मठामध्ये मंगळवार, दि. १७ मार्च २०२६ रोजी संपन्न होत आहे. सद्गुरु विचारांची देवाण-घेवाण होणाऱ्या पारनेर येथील या आत्मज्ञानी गणपत बाबा मठ या ठिकाणी सद्गुरु किसन बाबा चौरे यांचा पुण्यतिथी सोहळा भक्तिमय व मंगलमय वातावरणात पार पडत आहे.




प.पु.सद्गुरु किसन बाबा चौरे यांचे अध्यात्मिक अधिष्ठान हे वेगळ्या स्वरूपाचे होते. संसारिक जीवन जगत असताना गुरु ज्ञानाचा अवलंब करून परमार्थिक सुख कशाप्रकारे अनुभवावे यासाठी सद्गुरुचा साधकाच्या जीवनात कशाप्रकारे लाभ होतो. हे किसन बाबांनी आपल्या जीवनात दाखवून दिले आहे. आत्मज्ञानी गणपत बाबांच्या अध्यात्मिक कार्यात आपले आयुष्य घालवून योग साधनेतून आनंदी जीवन कसे जगावे त्या साठी जीवनात सद्गुरु पदाचे महत्त्व काय असते याची जाणीव आपल्या शिष्य मंडळांना पटवून दिली आहे. समाजातील जातिभेद अंधश्रद्धा अनिष्ट चालीरीती मोडण्यासाठी त्यांनी आपल्या गुरुपदाचा वापर करून शिष्य गणांना परमार्थिक सुखाची प्राप्ती करून दिली. अहिल्यानगर जिल्ह्यसह कोल्हापू, सातारा, सांगली, पुणे यासह महाराष्ट्रात विविध ठिकाणी शाहिरी बाण्यातून ढोलकी डफ तुनतुन्याच्या माध्यमातून अंधश्रद्धा निमूलन व समाज प्रबोधनपर कार्य करणारा सत्य अविनाश पारखपद समाज असून इतर जिल्ह्यातून हजारो भाविक भक्त हे पारनेरमध्ये या पुण्यतिथी सोहळ्या निमित्ताने एकत्र जमतात व पारनेरच्या बाजारपेठेतून सद्गुरु प्रतिमेची भव्य मिरवणूकीच्या माध्यमातून अध्यात्मिक भेदिक भजने व कलगी तुऱ्याचा सामना या लोककलेच्या माध्यमातून पारनेर शहरात पारनेरकर यांना अनुभवयास मिळतो. व संपूर्ण पारनेर शहर हे भक्तीमय होऊन जाते.

या भक्ती सोहळ्यात दुपारी १२ ते ०३ पारखपदी सत्संग, भेदीक गायन व भजन, ०३ ते ०६ पारनेर शहरातून महाराष्ट्रातील नामवंत शाहिरांचे गायन व शाहिरी जल्लोषात लेझीम व हलगीच्या निनादात सद्गुरू प्रतिमेची भव्य मिरवणूक निघणार असून, सायं. ०७ वा.सद्गुरू पादुकांची महापुजा व तद्नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच रात्री ९ ते पहाटेपर्यंत नामवंत शाहीरांचा भेदिक भजनाचा कार्यक्रम होणार आहे. आत्मज्ञानी गणपत बाबा मठ, जामगाव रोड, पारनेर येथे सदर कार्यक्रमास उपस्थित राहून परमार्थिक सुखाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प.पू.सद्गुरु बबनदादा चौरे व समस्त सत्य अविनाश पारख पद समाज पारनेर यांच्याकडून करण्यात येत आहे.

# नायगाव बीडीडी चाळ पुनर्वसन सदनिकांचे आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरण

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१५, मुंबई :** आशियातील नागरी पुनरुत्थानाच्या सर्वात मोठ्या बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील नायगाव येथील प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात पूर्ण झालेल्या ५ पुनर्वसन इमारतींतील एकूण ८६४ पात्र रहिवाशांना प्रातिनिधिक स्वरुपात सदनिकांचे वितरण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर, नरीमन पॉइंट येथे सोमवार, दि.१६ मार्च, २०२६ रोजी सकाळी १० वाजता करण्यात येणार आहे.

यामध्ये ४२३ सदनिका नागरिकांच्या सुरक्षेसाठी तत्पर असलेल्या पोलिस विभागातील निवृत्त पोलीस, त्यांचे वारस व कार्यरत पोलीस कर्मचाऱ्यांकरिता आहेत. म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळा मार्फत राज्य शासनाच्या अत्यंत महत्वाकांक्षी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाची अंमलबजावणी केली जात आहे. या प्रकल्पांतर्गत नायगाव येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाचे 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर बीडीडी संकुल' असे नामकरण करण्यात आले आहे.

नायगाव बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पात दोन पुनर्वसन इमारतीत एकूण २० टॉवर बांधण्यात येणार आहेत. यात पुनर्विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याअंतर्गत पुनर्वसन इमारत क्रमांक ०१ मधील एकूण ८ टॉवर्स पैकी ५ टॉवर्समधील ८६४ सदनिकांच्या वितरण कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकास, उद्योजकता व नावीन्यता मंत्री तथा मुंबई उपनगराचे सह पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा मुंबई उपनगराचे पालकमंत्री ॲड.आशिष शेलार, महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

नायगाव बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या ६.४५ हेक्टर जागेवर तळ अधिक ३ मजल्यांच्या ४२ चाळींमध्ये ३३४४ भाडेकरू वास्तव्यास आहेत. दोन टप्प्यात राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पात २३ मजल्यांच्या २० पुनर्वसन इमारती उभारल्या जात आहेत. पहिल्या टप्प्यामध्ये नायगाव बीडीडी चाळीतील प्लॉट 'ब' मधील १४०१ रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. यामध्ये ८ पैकी ५ पुनर्वसन इमारतींतील ८६४ सदनिकांच्या चाव्या मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान केल्या जात आहेत. उर्वरित ५३७ सदनिकांचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून एप्रिल २०२६ मध्ये हे काम पूर्ण होणार आहे. हा प्रकल्प राबवितांना एकूण भूखंडापैकी सुमारे ६५ टक्के जागेचा वापर पुनर्वसनासाठी करण्यात आला आहे. तसेच प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील प्लॉट 'अ' मधील १९ चाळींच्या जागेवर प्रस्तावित १२ पुनर्वसन इमारतींपैकी ३ पुनर्वसन इमारतींचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. पहिल्या टप्प्यांतर्गत चाळींतील रहिवाशांचे तात्पुरत्या संक्रमण शिबिरात स्थलांतरण करण्यात आले आहे. तसेच चाळीतील रहिवाशांना भाडे किंवा संक्रमण गाळे यापैकी पर्याय निवडण्याचा विकल्प उपलब्ध करून देण्यात आला. निवासी व अनिवासी गाळेधारकास २५ हजार रुपये प्रति महिना ११ महिन्यांचे आगाऊ भाडे देण्यात येत आहे.



सुमारे दोन ते तीन पिढ्यांपासून १६० चौरस फुटाच्या खोलीत राहणाऱ्या पात्र रहिवाशांना म्हाडामार्फत पुनर्वसन इमारतीत ५०० चौरस फूट चटई क्षेत्रफळाची अत्याधुनिक सोयी सुविधांनी युक्त २ बीएचके स्वरुपातील सदनिका मालकी तत्त्वावर विनामुल्य वितरित केली जाणार आहे. पुनर्वसन सदनिकेत व्हिट्रीफाईड टाईल, ॲल्युमिनियम फ्रेमच्या खिडक्या, ग्रानाईट स्वयंपाकाचा ओटा, अग्निरोधक यंत्रणा यासह ब्रांडेड प्लंबिंग फिटिंग्स आदी सारख्या अनेक सुविधा देण्यात आल्या असून भूकंप रोधक तंत्रज्ञानवर आधारित उभारलेल्या या इमारतींमध्ये दोन पॅसेंजर लिफ्ट, एक फायर लिफ्ट, सुरक्षेच्या दृष्टीने प्रत्येक मजल्यावर सीसीटीव्ही यंत्रणा देखील बसविण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत ३ मजल्यांचे बेसमेंट पार्किंग, स्टील्ट एरिया आणि प्रशस्त जिने आहेत.

नायगाव बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत एक स्वयंपूर्ण वसाहतीचे निर्माण होणार असून यामध्ये स्वतंत्र शाळेची इमारत, स्वतंत्र वेलफेअर सेंटर आदी सुविधांचे नियोजन करण्यात आले असून मलनिस्सारण प्रकल्प, सौर ऊर्जा प्रणाली, पर्जन्यजल संचयन आदी सुविधा असणार आहेत. तसेच या प्रकल्पातील पुनर्वसित इमारतींच्या सामायिक सोयी सुविधांची 'म्हाडा'तर्फे बारा वर्षे देखभाल केली जाणार आहे.नायगाव बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील लाभार्थ्यांना हा कार्यक्रम घरबसल्या पाहता यावा यासाठी म्हाडातर्फे सदर कार्यक्रमाचे वेबकास्टिंग करण्यात येणार असून, त्याचे थेट प्रक्षेपण म्हाडाच्या अधिकृत ाहरवरेषळलळरश्र या यूट्यूब तसेच फेसबुक चॅनलवरून करण्यात येईल.

तसेच प्रकल्पातील वयोवृद्ध व इतर लाभार्थ्यांच्या सोयीसाठी मंडळातर्फे प्रकल्पस्थळी, म्हणजेच नायगाव येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर बीडीडी संकुलातील पुनर्वसन इमारत क्रमांक टी-६ व टी-७ यांच्या आवारात विशेष मंडप उभारण्यात येणार आहे. या मंडपात सुमारे ५०० नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था करण्यात येणार असून, येथे यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आयोजित सदनिका वितरण समारंभाचे थेट प्रक्षेपण मोठ्या एलईडी पडद्यांवर पाहण्याची सुविधा 'म्हाडा'तर्फे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. देशातील नागरी पुनरुत्थानाच्या सर्वात मोठ्या बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता म्हाडा सुकाणू अभिकरण (नोडल एजन्सी) म्हणून म्हाडा सक्षमतेने कार्य करीत आहे. दि.१४ ऑगस्ट २०२५ रोजी वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यातील ५५६ सदनिकांचे वितरण करण्यात आले.

बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत मुंबईतील वरळी, ना.म. जोशी मार्ग- परळ, नायगाव येथील सुमारे ८६ एकर जागेवर वसलेल्या १९५ चाळींचा समावेश असून १५ हजार ५९३ रहिवाशांचे पुनर्वसन केले जात आहे. ना.म. जोशी मार्ग-परळ प्रकल्पामध्ये २ हजार ५६० निवासी व अनिवासी गाळे असून १४ पुनर्वसन इमारती बांधल्या जात आहेत. वरळी येथे ९६८९ निवासी व अनिवासी गाळे असून ३४ पुनर्वसन इमारती उभारण्यात येत आहेत. नायगाव (दादर) येथे ३ हजार ३४४ निवासी व अनिवासी गाळे असून २० पुनर्वसन इमारती उभारण्याचे काम सुरू आहे.

# गॅस वितरणाबाबत सरकारने घेतली कठोर भूमिका; लवकरच पुरवठा सुरळीत होणार

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१५, मुंबई :** आखाती देशातील युद्धामुळे राज्यात स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा निर्माण झाला आहे. बुकिंग करूनही गॅस मिळत नसल्यामुळे ग्राहकांच्या गॅस एजन्सीपुढे लांबलचक रांगा लागल्या आहेत. यामुळे सरकारने एका परिपत्रका द्वारे जिल्हाधिकाऱ्यांना गॅस पुरवठ्याचा प्राधान्यक्रम ठरवण्याचे दिशानिर्देश जारी केले आहेत. यात रुग्णालये, शैक्षणिक संस्थांसारख्या महत्त्वाच्या सेवांना १०० टक्के, तर काही क्षेत्रांना ५० ते ७० टक्के गॅस पुरवठा करण्याची सूचना देण्यात आली आहे.

आपत्कालीन परिस्थितीत राज्य सरकारने स्वयंपाकाच्या गॅसच्या पुरवठ्याला प्राधान्य दिले आहे. याप्रकरणी व्यावसायिक गॅसच्या परवठयावर अंशतः निर्बंध लादण्यात आले आहेत. याचा हॉटेल व्यवसायाला सर्वाधिक फटका बसला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने एका परिपत्रका द्वारे गॅस वितरणाविषयी एक



नियमावली जारी केली आहे. त्यानुसार, रुग्णालये, शैक्षणिक संस्था व सार्वजनिक सेवांना १०० टक्के गॅस पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तर इतर संस्था व विभागांना ५० ते ७० टक्के गॅस पुरवठा करण्याचे आदेश सरकारने दिले आहेत.

दरम्यान, राज्यात घरगुती एलपीजी गॅस आणि इंधनाचा पुरेसा साठा आहे. त्यामुळे आखाती देशातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील गॅस आणि इंधन पुरवठ्याबाबत अनेक संभ्रम तसेच अफवा पसरल्या जात असून, नागरिकांनी त्यावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन अन्न आणि नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी एक्स या समाज माध्यमावरील पोस्टच्या माध्यमातून केले आहे. पेट्रोल आणि डिझेलचाही पुरेसा साठा उपलब्ध असून रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत.

दरम्यान सरकारच्या निर्देशांनुसार, रुग्णालये, शैक्षणिक संस्था व सार्वजनिक सेवांना १०० टक्के गॅस पुरवण्यात येईल. स्मशानभूमी, वृद्धाश्रम व अनाथ आश्रमांनाही १०० टक्के गॅस पुरवठा करण्यात येईल. तर उपहारगृहे, संरक्षण क्षेत्र, शासकीय व सार्वजनिक क्षेत्र, रेल्वे, हवाई वाहतूक, पोलिस/तुरुंग यांना ७० टक्के गॅसचा पुरवठा केला जाईल. याशिवाय एसटी महामंडळ, औषध उद्योग, बीज प्रक्रिया व मत्स्यपालन क्षेत्राला ५० टक्के गॅस पुरवठा करण्याची मर्यादा सरकारने आखून दिली आहे.

# थोडक्यात

## अल्का आत्राम जोपासात आहे सामाजिक वारसा व्यक्ती - हरीश शर्मा



**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**

**दि.१५, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** आदरणीय सुधीर भाऊ मुंगनटीवार यांच्या कार्यकर्ते असलेल्या अल्का आत्राम यांनी आपल्या गुरुचा वसा जोपासात सामाजिक बांधिलकीने त्यांचा वाढदिवस साजरा करण्याचा माणस अल्का ताई मित्र परिवाराने व्यक्त करीत आज क्रांतिवीर बाबुराव शेडमाके यांच्या जयंतीचे औचित्य साधून तसेच भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या प्रदेश महामंत्री कुमारी अलका आत्राम यांच्या वाढदिवसानिमित्त नेत्र चिकित्सा तपासणी व शस्त्रक्रिया तसेच मोफत चष्मे वाटप रक्तदाब मधुमेह तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये परिसरातील नागरिकांची नेत्रतपासणी करण्यात आली. ज्यांना डोळ्यांच्या शस्त्रक्रियेची गरज आहे अशा रुग्णांची नोंदणी करून त्यांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अनेक गरजू नागरिकांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. या शिबिरात ७०० रुग्णाची तपासणी करण्यात आली. यावेळी अनेक रुग्णांना शस्त्रक्रिया सांगण्यात आली अनेक रुग्णांना चष्मा देण्यात येईल. त्याचबरोबर भाजपा महिला मोर्च्या चे वतीने फळ वाटप अनेक शाळा मध्ये नोटबुक पाणी बॉटल वितरित करण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यसेवा देण्याचा हा स्तुत्य उपक्रम असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.यावेळी अल्का आत्राम यांनी बोलताना सांगितले की माझा वाढदिवस गोरगरीब जनतेच्या सेवेने साजरा होतो हा माझ्यासाठी आनंदाचा क्षण आहे असे मत व्यक्त केले. या कार्यक्रम ला उदघाटक म्हणून हरीश शर्मा जिल्हा अध्यक्ष भाजपा, अध्यक्ष म्हणून पोंभुर्णा तहसीलदार मोहनीश शेळवटकर प्रमुख उपस्थिती यावेळी अल्का आत्राम अतिथी म्हणून नगराध्यक्ष सुलभा पीपरे, अजित मंगळगिरीवार उपनगराध्यक्ष हरीश ढवस, अध्यक्ष भाजप पोंभुर्णा रवींद्र मारपल्लीवार, सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती, राखूडे र वनपरीक्षेत्र अधिकारी श्री.कन्नाके, अधीक्षक ग्रामीण रुग्णालय ठाणेदार वंजारी, विनोद देशमुख महामंत्री, यादव काशीसिह तुळशीराम रोहनकर पांडुरंग पाल महेश रणदिवे संजय कोडापे वैशाली बोलमवार नंदा कोटरंगे शारदा गुरनुले मंचवार उपस्थित होते या कार्यक्रम आयोजन साठी अल्काताई मित्र परिवारातील सर्व सदस्यनी मेहनत करून शिबीर यशस्वी केले. या कार्यक्रमचे संचालन अजय मस्के प्रास्ताविक रवींद्र गेडाम आभार वैशाली बोलमवार यांनी मानले. यावेळी तालुक्यातील गोरगरीब जनतेनी मोठया संख्येनी आज लाभ घेतला त्यामुळे अल्का ताई मित्र परिवार यांनी सर्वांचे धन्यवाद मानले.

## खंडाळा महाविद्यालयाच्या प्राध्यापकांचे राष्ट्रीय संशोधन, प्रशिक्षण कार्यात उल्लेखनीय यश



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१५, खंडाळा (सातारा) :** खंडाळा येथील सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.प्रदिप मेंढापुरे, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा.ऋतुजा नवसरे यांनी केलेल्या संशोधन कार्य निबंधाची आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रगत व उपयोजित संशोधन पुस्तिकेत (IJAAR) दखल घेण्यात आली आहे. प्रा.मेंढापुरे यांनी महिला व बालविकास विभागाच्या विविध योजनांचा अभ्यास विषयावर डॉ.लक्ष्मण अवघडे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनपर निबंधलेखन केले. प्रा.ऋतुजा नवसरे यांनी शेती पिकातील मुळांच्या सभोवताल मातीमध्ये (Rhizosphere) सूक्ष्मजीवांचे (Microflora) अस्तित्व संशोधनासाठी डॉ.दादा नामदास यांचे मार्गदर्शन लाभले. दोन्ही प्राध्यापकांच्या संशोधन लेखन शैक्षणिक सामाजिक क्षेत्रातील ज्वलंत प्रश्नांवर उपाययोजना करणारे उल्लेखनीय कार्य असून आंतरराष्ट्रीय संशोधन पुस्तिकेत निबंध प्रसिद्धी ही उल्लेखनीय बाब आहे.

यासोबत राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा.अमीर इनामदार यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली (UGC) अंकित मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र (MMTTC) अंतर्गत NEP २०२० संवेदीकरण आणि अभिमुखता राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण कार्यक्रम संवेदनशील सहभागातून यशस्वीपणे पूर्ण केला. शिक्षकांना नावीन्यपूर्ण पद्धतीने अध्यापन करताना संशोधन कौशल्ये आणि नेतृत्व गुण विकसित करणे हा प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयातील तिन्ही प्राध्यापकांच्या राष्ट्रीय संशोधन प्रशिक्षण सहभागाबद्दल सर्वच स्तरातून कौतुक होत असून खंडाळा विभाग शिक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष शंकरराव गाढवे, उपाध्यक्ष सुरेश पवार, सचिव संजीव (अनिरुद्ध) गाढवे, सर्व समिती सदस्य आणि संचालक मंडळ, महाविद्यालय उपप्राचार्या डॉ.प्रतिभा पाटणे सर्व प्राध्यापक वृंद, राजेंद्र विद्यालय आणि उच्च माध्यमिक विद्यालय प्राचार्य तुळशीराम खांडे, कार्यालयीन अधीक्षक संतोष गाढवे, कार्यालयीन कर्मचारी वृंद तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी यांचेकडून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

## मुंबई लोकलच्या महिला कोचला आता गुलाबी रंग




**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१४, मुंबई :** मुंबई लोकलमध्ये महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी विशेष गुलाबी डबे सुरू करण्यात आले आहेत. रेल्वेच्या अधिकृत वृत्तानुसार, हा एक महत्त्वाचा रेल्वे प्रशासन उपक्रम आहे. विशेषतः एसी लोकल ट्रेनमध्ये महिलांचे डबे आकर्षक गुलाबी रंगात सजवण्यात आले आहेत, पिंक कोच/महिला डब्यांची वैशिष्ट म्हणजे प्लॅटफॉर्मवरून महिलांना आपला डबा सहज ओळखता यावा यासाठी गुलाबी रंगाचा पट्टा लावण्यात आला आहे.महिला डब्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत, जेथे पोलीस आणि होमगार्ड तैनात असतात दरम्यान काही एसी लोकलमध्ये महिलांचा डबा पूर्णपणे गुलाबी रंगाने सजवला असून तो स्वच्छ आणि आकर्षक बनवण्यात आला आहे. गर्दीच्या वेळी सुरक्षित प्रवास आणि गुन्हेगारांवर वचक निर्माण करणे. हे विशेष डबे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी अत्यंत प्रभावी ठरत असून, प्रशासनाने महिला डब्यांची संख्या वाढवण्यावर ही भर दिला आहे.